
REVIEW OF RESEARCH

# गांधी विचार : ग्रामीण विकासाठी वरदान

डॉ. सुभाष अमर सावंत

लोकनेते गोपीनाथजी मुंडे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्‌यालय, मंडणगड मु. पो. ता. मंडणगड, जिल्हा रत्नागिरी.

ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 8 | MAY - 2019



**सारांश ः**
भारत देशाच्या विकासाचा विचार करता भारताचा आत्मा खऱ्या अर्थाने खेडयात राहतो. जो पर्यंत या खेड्यांचा विकास होणार नाही तो पर्यंत या देशाचा विकास होणार नाही असे गांधीजींचे मत होते. म्हणूनच त्यांनी खेडयाकडे चला असा संदेश तरूणांना दिला. ग्रामीण विकासाचा विचार करता ग्रामराज्य, रामराज्य म्हणजेच स्वावलंबी खेडे ही खरी त्यांची संकल्पना होती.

## प्रस्तावना ः

प्राचीन खेडयांचे वर्णन करतांना पूर्वीची खेडी ही स्वायत्त होती. संपूर्ण देश राज्या राज्यांमध्ये विभागलेला होता. प्रत्येक साम्राज्याचा राजा हा स्वतंत्र होता. हा राजा मात्र खेडयांच्या स्वायत्तेला, त्यांच्या निर्णयाला धोका पोहचवत नव्हता. खेड्यांच्या विकासाचा निर्णय गावामध्ये घेतला जात असे. न्यायनिवाडा, संरक्षण, विकास, गावाला लागणारी सर्व उत्पादने, इ. या सर्व गोष्टीबाबत गावातच निर्णय घेतला जात असे. यामुळे ग्रामीण जीवन हे सुखी व समाधानी होते. म्हणूनच कदाचित भारतामध्ये सोन्याचा धूर निघत होता असे म्हटले जात असे. भारतात इंग्रज आले त्यांनी न्याय व्यवस्था, संरक्षण व्यवस्था याची स्वतंत्र स्थापना केली. इंग्लंड मध्ये औद्योगिक क्रांती घडविली जमीनदारी व्यवस्था निर्माण केली त्यामुळे येथील कारागीर शेतकरी हतबल झाला व खेड्यातून शहरात स्थलांतरीत होवू लागला. खेडी ओस पडू लागली. त्याचवेळी गांधीजींनी खेड्याकडे चला हा संदेश जनतेला दिला.

गांधीजींनी ग्राम विकास, शेती विकास, ग्रामीण पुनर्रचना, ग्राम उद्योग, ग्राम स्वच्छता, श्रम, शिक्षण इ. बाबत अनेक विचार मांडले व ते विचार समाजापर्यंत पोहचविणारे कार्यकर्ते निर्माण केले. यातूनच बाबा आमटे यांनी आदिवासी भागात जावून कुष्टरोग निर्मूलनाचे कार्य सुरू केले, अप्पासाहेब पटवर्धन यांनी गोपुरी आश्रमाच्या माध्यमातून शेती विकासाबरोबर अनेक कार्ये हाती घेतली अशा अनेक संस्था गांधीजींच्या विचार धारेतून देशभर निर्माण झाल्या व त्यांनी गांधीजींचे विचार समाजामध्ये रूजविण्याचे कार्य केले. आज पुन्हा एकदा गावाच्या विकासाच्या निमित्ताने गांधीजींच्या विचाराचा जागर करणे गरजेचे वाटू लागले आहे.

## उद्‌देश

प्राचीन खेड्यांच्या ग्रामीण विकास विषयक परिस्थितीचा अभ्यास करणे, म. गांधीजींचे खेड्यांच्या म्हणजेच ग्रामीण भागाच्या विकासाबाबतच्या विचारांचा अभ्यास करणे.

## गृहीत तत्वे

गांधीजींनी ग्रामीण विकाससंदर्भात मोलाचे विचार मांडले व त्यावर कृतीकरण्यास भाग पडले.गांधीजींचे हे विचार खेड्यांच्या पर्यायाने देशाच्या विकासाला चालना देवू शकतील.

## संशोधन पध्दती

म. गांधीजींचे विचार ग्रामीण विकासाला वरदान या विषयी सं”ोधन करतांना विविध

LBP PUBLICATION

गांधीजींच्या जीवनावर लिखित साहित्याचा अभ्यास संशोधकाला करावा लागला. त्यामध्ये संदर्भ ग्रंथ, वर्तमान पत्र, मासिके इ. दुय्यम सांधनाच्या आधारे हे संशोधन कार्य पूर्ण करण्यात आले आहे.

## गांधीजींचे ग्रामीण विकासविषयक विचार

### आदर्श ग्राम व्यवस्था व ग्राम पुनर्रचना

गांधीजींनी ग्रामस्वराज्याची सुंदर संकल्पना मांडली. गावातील लोकांच्या गरजा या गावातच पूर्ण झाल्या पाहिजेत. अन्न धान्य, दूध दुपते, भाजीपाला, कापूस या प्राथमिक बाबींची पूर्तता ही गावातच झाली पाहिजे असे त्यांचे मत होते. मिठासारखी एखादी गोष्ट वगळता गावामध्ये सर्व प्रकारचे उत्पादन झाले पाहिजे. पिण्यासाठी स्वच्छ पाणी पुरवठा हा गावाच्या मालकीचा किंबहुना त्यावर गावाचा मालकी हक्क असणारा असावा. गावातील गावात पुरेशी शिक्षण व्यवस्था असावी ती व्यवसायभिमुख असावी. चरखा हे देशातील गरिबांचे श्रमीकांचे प्रतीक ठरविले गेले. जनतेला लागणारा कपडा हा घरोघरी विणला गेला पाहिजे असे त्यांचे मत होते. ज्या दारूमुळे कुटुंबे उध्वस्त होतात त्या दारूला गावातून हद्दपार करण्याचा रचनात्मक कार्यक्रम गांधीजींनी ठरविला. या साठीच त्यांनी खेडी सोडू नका, खेड्यामध्ये सुधारणा घडवा, खेडी सुधारली तरच देशाचा विकास होईल असे त्यांचे मत होते. असे अनेक ग्रामीण विकासात्मक विचार गांधीजींचे असलेले दिसून येतात.

### गांधीजींचे शेती विषयक विचार

गांधीजींचा तंत्रज्ञान व यांत्रिकीकरणाला विरोध नव्हता. जिथे खरोखरच यंत्राची गरज असेल तेथे यांत्रिकीकरण केले पाहिजे. परंतु ज्या ठिकांनी मजुरांकडून काम करून घेणे सोपे आहे त्या ठिकांनी यांत्रिकीकरणाला त्यांनी विरोध केला. शेती बाबत सुध्दा त्यांचे हेच मत होते. गावातील शेतीलायक जमीन ही शेती उत्पादनासाठी वापरली गेली पाहिजे. त्यातूनच आपल्या शेती उत्पादन विषयक गरजा म्हणजेच अन्न धान्याची गरज ही गावातच भागली पाहिजे असे गांधीजींचे मत होते. स्थानिक अन्न धान्य पिकाला शेतीला प्राधान्य दिले पाहिजे नंतर नगदी पिकाचा विचार केला पाहिजे असे गांधीजींचे मत होते. परंतु इंग्रजांनी शेती हा घटक महसूल उत्पादनाचा घटक व व्यावसायीक उत्पादनापासून दूर केले होते. या शेतकऱ्यावर व शेतमजुरांवर इंग्रजांनी मोठ्या प्रमाणात अत्याचार केले होते. जमीनदारी व्यवस्था राबवून भारतीय शेती व्यवस्था अनुत्पादकतेकडे चालली होती. यासाठीच महात्माजींनी चंपारण्याचा सत्याग्रह केला होता. दुष्काळाणे होरपळणाऱ्या शेतकऱ्यांचा महसूल माफ व्हावा म्हणून गुजरात मधील खेडा जिल्हयातील शेतकऱ्यांनी गांधीजींच्या नेतत्वाखाली सत्याग्रह केला होता. थोडक्यात गांधीजींनी शेती व शेतकरी जगाला पाहिजे ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा मजबूत झाला पाहिजे यासाठी मोठया प्रमाणात प्रयत्न केलेले दिसून येतात.

### शिक्षण विषयक विचार

गांधीजींनी शिक्षण हे साधन असले पाहिजे ते अंतिम साध्य असता कामा नये असे त्यांचे मत होते. विद्यार्थी हा शिक्षणाने चारित्र्य संपन्न व नैतिकता पूर्ण व स्वावलंबी घडला पाहिजे यासाठी त्यांनी शिक्षणामध्ये नई तालिमचा समावेश केला. यामध्ये 6 ते 14 वयोगटातील सर्व मुलांना मोफत व सक्तीचे शिक्षण देण्यात यावे हे शिक्षण स्वावलंबी व पायाभूत स्वरूपाचे असावे असे गांधीजींचे मत होते. विशेषतः ग्रामीण भागात राहणाऱ्या स्त्रियांना शिक्षण देण्याची गरज गांधीजींनी प्रतिपादित केली आहे. स्त्रियांना जर गुलामगिरितून सुटका करायची असेल तर त्यांना शिक्षण देणे गरजेचे असून यासाठी ज्या पुढारलेल्या स्त्रिया आहेत त्यांनी त्यांच्या शिक्षणासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे असे गांधीजींचे मत होते.

### ग्राम उद्योगाविषयी विचार

ग्रामीण भागातील उद्योग हे शेती व स्थानिक नैसर्गिक साधनावर अवलंबून असतात. या उद्योगांमध्ये वाढ होणे गरजेचे आहे. साबण उद्योग, तेल घाणा, चरखा इत्यादी उद्योग ग्रामीण भागाची अर्थव्यवस्था चालवितात. असे उद्योग ग्रामीण भागात जीवंत राहणे गरजेचे आहेत असे त्यांचे मत होते.

## ग्राम व्यवस्थेतील सद्य स्थितीतील समस्या

ग्रामीण जीवनाचा विचार करता आज शेती व ग्रामीण जीवनापासून तरूण पिढी दूर जातांना दिसून येत आहे. आपले अर्धवट किंवा आवश्यक ते शिक्षण घेवून आजचा तरूण नोकरीच्या पाठीमागे धावतांना दिसून येत आहे. यामुळे ग्रामीण भागातील शेती ही पडीक स्वरूपात असलेली दिसून येत आहे. दुसऱ्या बाजूला शहरातील जनसंख्या वाढल्यामुळे शहरातील नवीन प्रश्न त्या ठिकाणी उभे राहत आहेत. गावातून तरूणांचे स्थलांतरण झाल्यामुळे गाव ओस पडलेले दिसून येत आहेत. त्यामुळे गावाच्या विकासाला खिळ बसलेली दिसून येत आहे. गावामध्ये पाणी, आरोग्य, अंधश्रद्धा, जाती व धर्म व्यवस्था इ. अनेक समस्या निर्माण होतांना बघावयास मिळत आहेत.

## गांधीजींच्या विचाराने सद्य स्थितीत होवू घातलेले बदल

आज शहरी जीवनाला व धकाधकीला कंटाळून अनेक जनता आता ग्रामीण भागाकडे वळू लागली आहे. काही तरूणांना नोकरीतील गुलामी करण्यापेक्षा आपण आपली शेती आधुनिक पद्धतीने करून आपला विकास करू शकतो याची जाणीव होतांना दिसून येत आहे. यातूनच अनेक ग्रामीण तरूण शेती व शेती पूरक उद्योग व्यवसाय ग्रामीण भागात सुरू करतांना दिसून येत आहे. सेंद्रिय शेती व सेंद्रिय अन्न धान्य भाजी पाला, घाण्याचे तेल, गावठी गाईचे दूध, तूप, फळ प्रक्रिया उत्पादने अशा अनेक उद्योगांबरोबर ग्रामीण पर्यटन व कृषी पर्यटनातून ग्रामीण अर्थ व्यवस्था आकाराला येवू घातली आहे. अनेक लोकांनी पर्यटनांसाठी ग्रामीण भागाला पसंती देवू केलेली पाहावयास मिळत आहे. यातूनच ग्रामीण पर्यटन व कृषी पर्यटन व उद्योग उभे राहत आहेत. गावाच्या विकासासाठी तरूण मंडळी एकत्र येवू लागली आहेत. गावातील पाणी प्रश्न सोडविण्यासाठी अनेक गाव आता प्रयत्न करू लागले आहेत.

थोडक्यात गांधीजींनी दिलेली हाक खेड्याकडे चला याचा आता जनतेला अर्थ कळू लागला आहे. जनतेला हे कळू लागले आहे की शेतीतूनच आपला व देशाचा विकास घडू शकतो. हे सर्व गांधीजींच्या विचार धारेतून घडतांना बघावयास मिळत आहे.

## संदर्भ

हिंद स्वराज्य, परंधाम प्रकाशन, पवनार वर्धा
माझ्या स्वप्नाचा भारत – परंधाम प्रकाशन , पवनार वर्धा

LBP PUBLICATION